**निशाणी ९४ खाली**

**<u>प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. ०२ कारभारी गंगाधर उबाळे याचा शपथेवर इ-प्रणालीद्वारे दाखल सरतपासावर उलट तपास वादी तर्फे ॲड श्री. एस.पी. पाथ्रीकर यांचे मार्फत सुरु</u>**

६. माझे मॅट्रीकपर्यंतचे शिक्षण झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी नारायण तांदळे याच्या मुलासोबत आज न्यायालयात आलो आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला न्यायालयामार्फत समन्स आले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे प्रतिवादींसोबत चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी कामानिमित्त दुय्यम निबंधक कार्यालयात जात असतो. हे म्हणणे खरे नाही की, मला दुय्यम निबंधक कार्यालयात होणा-या व्यवहाराबाबत माहिती आहे. मी तीन ते चार वेळेला दुय्यम निबंधक कार्यालयात गेलेलो आहे. मी पहिल्यांदा दुय्यम निबंधक कार्यालयात वडिलांची जमीन माझ्या नावावर करण्याकरीता गेलो होतो. त्या व्यतिरिक्त मी कोणत्या तारखेस गेलो होतो हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कोण कोणत्या कामास दुय्यम निबंधक कार्यालयात गेलो होतो हे मला सांगता येणार नाही.

७. हे म्हणणे खरे आहे की, नारायण तांदळे याचे घर व माझ्या घरामध्ये भरपूर अंतर आहे. अंतर २०० ते २५० फुटाचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझी व नारायण तांदळेची शेती जवळ नाही. हे म्हणणे खरे आहे की, नारायण तांदळे मयत झाले त्यावेळी ते वयस्कर होते. त्यांचे वय मला सांगता येणार नाही. माझी नारायण तांदळेसोबत मैत्री होती. नारायण तांदळेचे शिक्षण किती झाले होते मला सांगता येणार नाही. मी नारायणचे जमीनीचे ७/१२ उतारे बघीतले नव्हते. हे मला सांगता येणार नाही की, नारायण तांदळे बँकेचे व्यवहार करतांना सही करायचा. हे म्हणणे खरे आहे की, नारायण तांदळे कधी कधी आजारी आसायचे. हे म्हणणे खरे आहे की, वयोमानानुसार नारायणचा स्वभाव विसरभोळा झाला होता. त्याला काही बाबी लक्षात राहत नव्हत्या. हे म्हणणे खरे आहे की, नारायणचे मुले त्याची काळजी घेत. हे म्हणणे खरे आहे की, मुले त्याला दवाखान्यात नेत असत.

८. हे म्हणणे खरे नाही की, मृत्यूपत्र करायचे दिवशी नारायणचा मुलगा त्याच्यासोबत आला होता. नारायण रिक्षात आला होता. त्यादिवशी मी, नारायण व गावातील एक इसम आलो होतो. नारायण याने दुय्यम निबंधक कार्यालयात मृत्यूपत्र करुन देतो असे सांगीतले होते. हे म्हणणे खरे आहे की, दुय्यम निबंधक कार्यालयातील साहेबांनी मृत्यूपत्र लिहून घेतले होते. मृत्यूपत्र टायपिंग केले होते. मृत्यूपत्र ऑफीसमध्येच टायपिंग केले होते. स्टँपचा खर्च नारायणने दिला होता. खर्च किती आला होता हे मला सांगता येणार नाही. स्टँप देखील साहेबांनी दिला होता. मला साहेब कोण होते हे सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी व तांदळे स्टँप विक्री करणा-या लोकांकडे गेलो नव्हतो. हे मला सांगता येणार नाही की, स्टँप कोणाच्या हस्ते घेतला होता. मला सांगता येणार नाही की स्टँप हस्ते म्हणून कोणी सही केली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी स्टँप बघीतला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, स्टँप टाइप झाला त्यावेळी तेथे हजर नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, माझी फक्त सही घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, मला मजकूर वाचून दाखवला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, मी गावातील असल्यामुळे स्टँप नि.७२ वर सही केली होती.

९. हे मला सांगता येणार नाही की, माझ्या शपथपत्रातील मजकूर प्रतिवादीने सांगीतल्याप्रमाणे लिहिण्यात आला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला नारायण तांदळे, जगन्नाथ तांदळे व त्याच्या

भावांची कोणत्या गटात किती जमीन आहे सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माइया शपथपत्रातील परिच्छेद क्र. ५ मधील मिळकती वकीलांनी लिहून घेतल्या व त्यानंतर मी शपथपत्रावर सही केली. नारायण तांदळे याने तो मयत होण्याच्या ४ ते ५ वर्षे पूर्वी मला त्याच्या घरी बोलावले होते. मला नारायण कधी मयत झाला याची तारीख सांगता येणार नाही. मला नारायणने कधी बोलावले होते याच तारीख सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि. ७२ वरील मृत्यूपत्र माइयासमोर करण्यात आले नाही. हे म्हणणे खरे नाही की, खोटे शपथपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की आजरोजी खोटी साक्ष दिली.

उलट तपास पूर्ण.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत  समक्ष

sd/-

**(धनंजय एस.देवरे)**

**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, फुलंब्री**

**दि.०६.२.२०२४**